माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: ९१/२०२३**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
| श्री. हरीदास विश्वनाथ इंगळे, मु.पो. ब्राम्हणी, वार्ड नं.५, शिक्षक कॉलनी, न. प. कळमेश्वर-ब्राम्हणी, ता. कळमेश्वर जि. नागपूर | बांधकाम अभियंता, नगरपरिषद कळमेश्वर, ब्राम्हणी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर | मुख्याधिकारी, नगरपरिषद कळमेश्वर, ब्राम्हणी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर |

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

## सुनावणी दिनांक १७.१२.२०२४

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. १६७९/२०२० दिनांक १४.०७.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक १७.१२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, श्री. निशिकांत पाटील व प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, श्री. आकाश सुरडकर उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. १६७९/२०२० मध्ये दिनांक १४.०७.२०२२ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

"अपीलार्थी यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तसेच विनंती अर्जानुसार त्याचे निराकरण झालेले असल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी विषय क्र. २ संदर्भातील गायकवाड लेआऊट वार्ड नं. ५ ब्राम्हणी येथील तारेच्या कुंपनाच्या ठरावाची प्रत पुरविण्यात आली असली तरी त्या ठरावासंदर्भातील सर्व कागदपत्रे कलम २(च) नुसार अपीलार्थीस तात्काळ विनामुल्य प्रदान करण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी. तसेच मुख्याधिकारी, नगर परिषद कळमेश्वर ब्राम्हणी यांनी अपीलार्थी यांच्या माहिती अर्जाचे व तक्रार अर्जाचे अवलोकन करुन त्यावर प्रशासकीय स्तरावर लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करावी. विशेषत: झालेल्या कामाच्या गुणवत्तेविषयी अपीलार्थी यांनी केलेल्या तक्रार अर्जाची लवकरात लवकर योग्य ती दखल घेवून नियमानुसार कार्यवाही करावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा" या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आला होता.

उपरोक्त आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक २०.०३.२०२३ (प्राप्त दिनांक २१.०३.२०२३) रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, "असमाधानकारक व अपुरे

काम केल्याबाबत व त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना व इतर नागरीकांची अत्यंत गैरसोय होत असल्याबाबत तसेच सत्य योग्य परिस्थिती पाहून योग्य न्याय देऊन जे सत्य असेल ते योग्य समजून मागासवर्गीय नागरीकांवर होणारा अन्याय दुर करुन व्यवस्थित चांगले समाधानकारक काम व त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय परिसर व बुध्द विहार परिसराचे सौंदर्यीकरण, सुशोभीकरण नगर परिषद कळमेश्वर ब्राम्हणी यांचेकडून करुन द्याल" अशी आयोगास विनंती केली आहे.

सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशानुसार पत्र क्र. २००५/२३, दिनांक ०२.०२.२०२३ अन्वये माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच तक्रारकर्ता यांनी दिनांक २१.०८.२०२३ च्या पत्रान्वये सदर कामे समाधानकारक झाली असल्याबाबत मुख्याधिकारी कळमेश्वर यांना कळविले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही झाली असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक: १७.१२.२०२४

जा.क्र.-1803-दि.------------
28 MAR 2025